# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २४ ऑगस्ट २००९ (का.प.क्र.३२) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

सोमवार दिं.२४/०८/२००९ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.१२.४५ वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला उपआयुक्त (म.) श्री.उध्दव घुगे,नगर सचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भाऊसाहेब बाबुराव वाघ
०२. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०३. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
०४. स.स.श्री.संजय उत्तमराव जगताप
०५. स.स.श्री.बमने पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलिंद यशवंत
१२. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१३. स.स.श्री.जेम्स अंबिलढगे
१४. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१५. स.स.सौ.विजयाताई बनकर
१६. स.स.श्रीमती मसरत बेगम शरफोद्दीन
१७. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.सौ.रजनी रमेश जोशी
२०. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२१. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२२. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२३. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२४. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२५. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२६. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२७. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद
२८. स.स.श्रीमती खान मेहरून्निसा खान हमीद
२९. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
३०. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर
३१. स.स.श्री.खान जावेद हसन कासिम हसन
३२. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन

३३. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
३४. स.स.श्रीमती लता श्रीनिवास दलाल
३५. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनूस
३६. स.स.श्री.शेख इब्राहीम पटेल शेख इमाम
३७. स.स.श्री.खान हाजी शेरखान अ.रहेमान
३८. स.स.श्रीमती मुमताज बेगम वाहेद खान
३९. स.स.सौ.राऊत छाया विलास
४०. स.स.श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर
४१. स.स.श्री.अशोक गोरखनाथ विरकर
४२. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४३. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४४. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
४५. स.स.श्री.संतोष सुधाकरराव जेजुरकर
४६. स.स.श्री.सलिम पटेल समशेर पटेल
४७. स.स.श्री.त्र्यबंक तुपे
४८. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४९. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
५०. स.स.श्रीमती बोरामणीकर कला सुरेश
५१. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
५२. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५३. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
५४. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५५. स.स.श्रीमती रेखा कैलास काथार
५६. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५७. स.स.श्रीमती पाटणी हर्षमाला विजयकुमार
५८. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
५९. स.स.श्री.खुडे विजय किसन
६०. स.स.श्री.खेंडके पाटील संतोष
६१. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
६२. स.स.श्री.दामोधर माधवराव शिंदे
६३. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६४. स.स.श्रीमती सरिता अशोक ससाणे
६५. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६६. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६७. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६८. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६९. स.स.श्री.विसपुते शशांक दामोधर
७०. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७१. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७२. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७३. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७४. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७५. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ

७६. स.स.श्री.संजय पांडूरंग शिरसाट
७७. स.स.श्रीमती अल्पा विकास जैन
७८. स.स.श्रीमती मोमीन सफिया फिरदोस अय्युब खान
७९. स.स.श्रीमती अनिता नंदकुमार घोडेले
८०. स.स.श्री.विनोद सोनवणे

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.राजेश (पप्पु) व्यास
०२. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०३. स.स.श्री.सुरेंद्र कुलकर्णी

**चर्चा :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :सभा ठरलेल्या वेळेवर सुरू होत नसल्याने आमची इतर कामे होत नाही त्यासाठी वेळेवर सभा सुरू व्हावी अशी विनंती आहे.

डॉ.भागवत कराड :स.सदस्य श्री.संजु रिडलॉन यांचे बंधू स्व.सुमित सुग्रीव रिडलॉन तसेच राज्याचे माजी सहकारी मंत्री स्व.यशवंतराव मोहिते-पाटील यांचे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने त्यांना दोन मिनिटे स्तब्द उभे राहून श्रध्दाजली अर्पण करावी.

श्री.दभाभाउ पाथ्रीकर :यास माझे अनुमोदन आहे

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : आमच्या पक्षातील सर्व सदस्यांचे अनुमोदन आहे.

मा.महापौर : ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

याचवेळी स्व.सुमित रिडलॉन तसेच राज्याचे माजी सहकारी मंत्री स्व.यशवंतराव मोहिते पाटील यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.मो.जावेद मो.इसहाक :२२ दिवसापासून माझे वार्डात काही भागात पाणी येत नाही. संबधीत अधिकारी यांना निदर्शनास आणून दिले अदयाप पाणी पोहचले नाही रमजान या पवित्र महिण्याचे उपवास चालू आहे नागरीकना बोरींगचे पाणी प्यावे लागते अनेकजण या पाण्यामूळे बिमार पडत असून औषधोपचार घेत आहे. यास जबाबदार कोण?

श्री.महेश माळवतकर : सिडको हडको भागात दोन महिण्यापासून नियोजन नसल्याने ठरलेल्या वेळेत पाणी येत नाही.जे येते ते ३०-३५ मिनिटे असते. मोठे सण उत्सव असतांना काल अनेक भागात पाणी नव्हते.आता गणपती उत्सव चालू आहे मागिल वर्षी रस्ता खराब असल्यामूळे गणपती विसर्जन मिरवणुकीचा मार्ग बदलावा लागला होता या रस्त्यावर मोठमोठे खड्डे असून आपण पाहणी करावी व गणपती विसर्जनाच्या दिवसापंर्यत या रस्त्यांचे पॅचवर्क करण्याचे आदेशीत करावे. एका पावसात पॅचवर्क निघून जाते कुणाचे हित जपले जाते काय असा प्रश्न पडतो. अविष्कार चौक ते टीव्ही सेन्टर चौकापर्यत रस्त्याची अवस्था वाईट आहे मोठया आशेने सिडकोचे महापालिकेकडे हस्तांतरण झाले त्यापोटी शासनाने २५ कोटी दिले परंतु प्रशासनाने या भागाकडे विकास कामाच्या बाबतीत दुर्लक्षच केले खऱ्या अर्थाने अजून मोठा पाऊस झालेला नाही थोडया पावसाने लोकांच्या घरात पाणी जात असेल व तात्पुरती डागडुजी करणार असेल तर हे योग्य नाही.आझाद चौका पर्यत असलेल्या रस्त्यावरील सर्व सोसायटीमध्ये पावसाचे पाणी

जाते फोटोसेशन करून खुप काम करतो असे न दाखविता लोकांच्या घरात पाणी जाणार नाही याची दखल घ्यावी. दै.सकाळने साफसफाईच्या बाबतीत अग्रलेख लिहिला त्यांची दखल घेतली पाहिजे. सिडको हडकोमध्ये स्वच्छतेचे काम बचत गटाकडून होते त्यांचे कडे लेबर कमी आहे माझे वार्डात १२ कर्मचारी ४ डिप्परवर ४ सफाई करतात तर ४ कडे घंटा गाडी असून एवढया वार्डात १२ लोक काम करतात यासाठी यंत्रणा वाढवावी सुचना पत्र दिले कार्यवाही झाली नाही त्यामूळे अनेक ठिकाणी कचऱ्यांचे ढिग दिसून येतात नागरीक टॅक्स भरतात आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे तर कामे होणार काय?बजेट मंजूर केले अदयाप बजेटची प्रत मिळाली नाही आचारसहितां लागल्यास कामे होणार नाही विकास कामे होण्याकडे आपण लक्ष दयावे सिडको हडको भागातील नागरीकांना न्याय देणार असेल तर या भागात सफाई कामगार वाढवावे, पाण्याच्या वेळा निश्चित कराव्या,नागरीकांच्या घरात पाणी जाते संरक्षित भिंत करणे तसेच गणपती विसर्जनाचा मार्गावरील पॅचवर्क करण्यात यावे.

श्री.सलीम खान :माझे वार्डात ४-५ महिण्यापासून पाणी नाही. बिबीका मकबरा मागे घाण पाणी येते. या संदर्भात माहिती दिली कार्यवाही झाली नाही.सन २००८-०९ च्या बजेटमधील कामे झालेली नाही नवीन बजेट बुक दिलेले नाही त्यात कोणकोणती कामे घेतली कामे होणार की नाही माहित नाही. ३ गल्ल्यात दुषीत पाणी येते.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :स्वाईन फ्यू च्या संदर्भात शहरात जे वाल्मीकी समाजाचे लोक आहे त्यांना जागा देण्याचा जो प्रश्न आहे जागा देण्यात यावी शहरात स्वच्छता होईल व त्या समाजाचा रोटीरोजीचा प्रश्न ही सुटेल.असा मी ठराव मांडतो ऐनवेळी मंजुर करावा.

श्री.गजानन बारवाल :मागिल बैठकीत ठरल्या प्रमाणे महापौर दालनात मालमत्ता संदर्भात बैठक घेवून आपण मा. आयुक्तांना मालमत्ताच्या संदर्भात योग्य निर्णय घेण्याचे आदेशीत केले होते त्या संदर्भात काही माहिती आपणांकडे आलेली आहे का ?

श्री.सलीम खान :माझे वार्डात घाण पाणी येत आहे त्या बाबत व्यवस्था करण्याचे आदेशीत करावे.

मा.महापौर : आपले म्हणणे प्रत्येकाने थोडक्यात मांडावे.

श्री.अ.रशिद खान :रमजान उपवास व गणपती उत्सव चालू आहे. मोठया रस्त्यावर खड्डे पडले मुरूम न टाकता डांबराने पॅचवर्क करावे.

श्री.शंशाक विसपुते गारखेडा भागात साईनगर, भारतनगरमध्ये नागरीकांच्या घरात पावसाचे पाणी शिरले होते.या प्रसंगी वार्ड अधिकारी व त्यांचे टीमने २ दिवस सुटया असतांना देखील चांगली मदत केली मेहनत घेवून पाणी बाहेर काढले अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकाम झाली त्यामूळे ही वेळ आली कोठे बांधकामे होतात चालू असतात प्रशासकीय विभागास माहित असते वेळीच थांबविले जात नाही.यापूढे असा प्रकार होवू नये यासाठी प्रशासनाने दक्ष रहावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :३ दिवसापुर्वी वरुणराजाची कृपा झाली पाऊस पडला कमी पावसात देखील अनेक लोकांच्या घरात पाणी जाउन नुकसान झाले दैनिकांच्या माध्यमातून वाचण्यात आले.सुरूवातीच्या पावसाप्रमाणे कालच्या

पावसात परीस्थिती उदभवली सिडको टाउन सेंन्टर जयभवानीनगर पर्यत पाणी जाते तेथून पूढे पाणी जाण्यास नालाच नाही पुढील नाल्याचे काम होण्यासाठी पाहणी झाली या कामाच्या विविध संचिका सादर झाल्या परंतु बजेटमध्ये कुठे तरतूद आहे उल्लेख नसल्यामूळे परत गेल्या काम झाले नाही आवश्यक असते ते करणे गरजेचेच असते परवाच्या पावसाने ३००-३५० घरामध्ये पाणी गेले स्थायी समितीच्या बैठकीतुन अधिका-यांना तेथे पाठविले एन-३ एन-४ चे पाणी शिवाजी महाराजाच्या पुतळयापर्यंत होते. तेथील काम करण्याची गरज आहे पुन्हा अशी वेळ येवू नये या नाल्याचे काम करण्यासाठी बजेट मध्ये तरतूद करावी व पुढील काम सुरू करावे सिडको हडकोत मागिल वर्षी रस्ते खराब असल्यामूळे गणपती विसर्जनाचा मार्ग बदलावा लागला होता या रस्त्यावर पॅचवर्क करण्यात यावे.रमजान तसेच गणपती उत्सवास सुरूवात झाली अनेक रस्त्यावरील लाईट बंद आहे. टीव्ही सेन्टर ते एन-६ चौकापर्यत रस्त्यावरील लाईट बंद आहे ते लावण्याची गरज आहे देखभाल दुरूस्ती साठी तरतुद करण्याची गरज आहे ती करावी

श्री.हिम्मतराव दाभाडे :वार्ड ९० द्वारकानगरी येथे जोशी नावाचे बिल्डर यांनी प्लॅटचे अनधिकृत बांधकाम करीत आहे त्यांना सर्वीस लाईन वरून नळ कनेक्शन न देता जागेवरच मेन लाईवरून कनेक्शन कोणत्या नियमाने दिले व ते देता येते का?

श्री.मोहन मेघावाले :या भागात मागिल वर्षी रस्त्यावर खड्डे असल्यामूळे गणपती विसर्जनाचा मार्ग बदलावा लागला होता त्वरीत पॅचवर्क करावे तसेच या भागात दोन महिण्यापासून लाईट बंद आहेत तक्रार करून सुध्दा कार्यवाही केली नाही एकदिवसाआड पाणी दिले जाते परंतु पुर्ण वर्षाची पाणीपटटी या भागातील लोक भरणा करतात.नेहमीच या भागाच्या नागरीकांवर अन्याय होतो तो दुर करावा.मालमत्ता कर १००% वसुल होतो.

श्री.प्रल्हाद निमंगावकर :वार्ड फ चे कार्य. अभियंता बैठकीला उपस्थित नाही.मल्हार चौक ते तिरूपती विहार पर्यंत पावसाचे पाण्याची विल्हेवाट लावण्याच्या कामाचे ३-४ वेळेस टेंडर काढले काम का झाले नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :लाईट,पाणी संदर्भात जेवढे प्रश्न असतील ते सोडविण्याचे आदेशीत करावे.

श्रीमती कला बोरामणीकर :माझे वार्डात दोन महिण्यापासून लाईट बंद आहे.

मा.महापौर :अनेक सदस्यांनी आपआपल्या भावना व्यक्त केल्या स.सदस्य श्री.मो.जावेद मो.इसहाक यांचे वार्डात २२ दिवसापासून पाणी नाही. स.सदस्य श्री.काशिनाथ कोकाटे व श्री.महेश माळवतकर यांनी सिडको हडको भागात वेळेवर पाणी येत नाही असे म्हटले येणारे दिवस हे रमजान व गणपती उत्सावाचे आहे त्यामूळे पाण्याची गरज आहे. रमजान व गणपती उत्सावाचे दिवसात संपुर्ण भागात पाणी मिळेल याची प्रशासनाने दखल घ्यावी.आताच म्हटल्या प्रमाणे मागिल वर्षी हडको मध्ये पुल पडलेला असल्याने गणपती विसर्जनाचा मार्ग बदलावा लागला होता. आता सुध्दा त्या पुलाची परीस्थिती तशीच आहे त्यासाठी सिडको हडको तसेच शहरातील जे गणपती विसर्जनाचे मार्ग आहे त्या

रस्त्याची पाहणी करून जेथेजेथे रस्ता खराब असेल तेथे ५-६ दिवसात पॅचवर्क करून घ्यावे.तसेच अविष्कार चौक ते टीव्ही सेन्टर चौक हे गणपती विसर्जनाचे मार्गावर आहे याचौकाची ताबडतोब दुरूस्ती करून घ्यावी. आताच स.सदस्य श्री.महेश माळवतकर,श्री.काशिनाथ कोकाटे व सिडकोतील अनेक सदस्यांनी प्रश्न मांडला की पावसाचे पाणी अनेक लोकांच्या घरामध्ये गेले.मागिल वर्षी सुध्दा अशाच प्रकारे पाणी गेले होते मी स्वत: पाहणी केली होती. घरामध्ये जे पाणी जाते ते जाणार नाही यासाठी जी काही कार्यवाही करायची ती प्रशासनाने आपल्या स्तरावर करावी. स.सदस्य श्री.सलीम खान यांचे वार्डात अनेक दिवसापासून खराब पाणी येते. ते येणार नाही याची प्रशासनाने कार्यवाही करावी. नागरीकाच्या आरोग्याला बाधा पोहचणार नाही. आताच या सभागृहात स्वाईनफ्ल्यूचा विषय समोर आला अतिशय सेन्सीटयूव विषय आहे जेष्ठ सदस्य श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी आताच म्हटल्याप्रमाणे जो शहरात वाल्मीकी समाज व जे वराह पालन करतात त्यांना कुठेतरी वेगळया ठिकाणी जागा दिली पाहिजे जेणे करून शहर वासीयांना त्रास होणार नाही व त्यांची ही सोय होईल. त्यासाठी त्यांना जागा देण्याची ताबडतोब व्यवस्था करण्यात यावी. अनेक ठिकाणी लाईट बंद आहे. गणपती विर्सजन होणाऱ्या रस्त्यावरील व शहरातील सर्वच वार्डात जेथे लाईट बदं असतील ते ३ दिवसात चालू करण्यात यावे. गारखेडा परीसरात कालच्या पावसाचे अनेक भागात पाणी शिरले अनेक ठिकाणी अतिक्रमण झाल्याने पाणी शिरले आहे. अतिक्रमण होणार नाही याची दखल घ्यावी. जेंव्हा पाणी घरात शिरते ते का शिरले याची पाहणी करून कार्यवाही करावी.होत असलेले अतिक्रमण थांबवावे.सिडको हडको भागात असे अनेक स्पॉट आहे त्यात पोस्ट ऑफिस,आझाद चौक, प्रतापगडनगर,एन-३-४, टाऊन सेंन्टर, नवजीवन कॉलनी असेल व इतरही काही स्पॉट असतील अशा ठिकाणी पावसाचे पाणी लोकांच्या घरामध्ये जाणार नाही त्यासाठी जी काही कार्यवाही करावी लागणार आहे ती प्रशासनाने करावी.स.सदस्य श्री.हिम्मतराव दाभाडे यांचे वार्डात पिण्याच्या पाण्याच्या लाईनवर एका बिल्डरने अतिक्रमण केले तेथील पाहणी करून ते थांबविण्यात यावे.लाईटची व्यवस्था करण्यात यावी. शहरातील अनेक रस्त्याची कामे केली होती ती अल्पकालावधीत खराब झाली याची मा.प्रशासनाने चौकशी करावी व जेथे रस्ते खराब झाले त्यांची दुरूस्ती करावी.

सौ.रजनी जोशी : पावसाचे पाण्यासह ड्रेनेजचे पाणी लोकांच्या स्वंयपाक घरात शिरले अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता सुटटी आहे असे सांगण्यात येते. ठेकेदाराचे बील दिलेले नाही. अपातकालीन परिस्थितीत काही उपयोग नाही. साधे पाणी असतेतर आम्ही काढलेही असते. परंतु ड्रेनेज युक्त पाणी होते. कोणीही आले नाही. रात्री पाऊस झाला असता तर पावसाचे पाणी साचते किंवा लोकांच्या घरात जाणार नाही यासाठी कार्यवाही करावी.

श्री.संतोष खेंडके :माझे वार्डात नुकताच एका मुलाचा पावसाचे वाहते पाण्यात पडून मृत्यू झाला अदयाप लाईन साफ केली नाही पुन्हा अशी घटना होवू शकते. याची दखल घ्यावी.

| | |
|---|---|
| मा.महापौर | :सदर साईडड्रेन मातीने भरलेल्या आहे त्वरीत साफ करावे तसेच मल्हार चौक ते तिरूपती विहार पर्यत पावसाचे पाणी साचणार नाही याची दखल घ्यावी. |
| श्री.मो.जावेद मो.इसहाक | :रमजान महिणा,गणपती उत्सव चालू आहे १० टक्के पाणी कपात करणार होते ते १ महिणा करण्यात येवू नये. |
| श्रीमती मेहरून्नीसा खान | :माझे वार्डात ड्रेनेजचे घाण पाणी वाहते. एकतर पाणी मिळत नाही त्यातही दुषीत पाणी. सुचना करूनही दुरूस्ती होत नाही. पाणीपुरवठा अभियंता ऐकत नाही. अधिकाऱ्यांना फोन केला तरी ऐकत नाही. तसेच काही भाग उंचावर असल्याने व त्या लाईनवर अलीकडील भागात अनधिकृत कमर्शियल नळ असल्यामूळे उंचावर पाणी जात नाही अनाधिकृत कमरशिअल नळ कनेक्शन काढण्यात यावे तसेच रमजानचे एक महिणा उपवास आहे या कार्यकाळात पिण्याचे पाणी कपात करू नये. |
| मा.महापौर | स.सदस्या श्रीमती मेहरून्नीसा खान यांचे वार्डात ड्रेनेजचे घाण पाणी येते मी प्रत्यक्ष पाहणी केली या बाबत तात्काळ कार्यवाही करावी तसेच उंचावरील भागात पिण्याचे पाणी जात नाही त्या लाईन वर असलेले कमरशिअल अनधिकृत नळ कनेक्शन त्वरीत बंद करावे पाणी कसे मिळेल या संबधी कार्यवाही करावी सध्या १ महिण्यात रमजानचे उपवास गणपती उत्सव व गौरीपुजनाचे उत्सव असल्यामूळे पिण्याच्या पाण्यात कोणतीही कपात करण्यात येवू नये. |
| श्री.तरविंदरसिंग धिल्लन | :मिटमिटा पडेगाव भागात पिण्याचे पाणी दिले जात नाही पाणीपुरवठा करणार नसाल तर पाणी पटटी घेवु नये. नागरीक बोरींगचे विहिरीचे पाणी पितात आजारास नागरीकांना सामोरे जावे लागते स्वाईन प्ल्यु चालु आहे. विहिरीमध्ये जंतूनाशक औषधी टाकावी पाणीपुरवठा करू शकत नसेल तर विहिरीवरून नागरीकांना पिण्याची पाण्याची व्यवस्था करून दयावी त्या विहिरी अधिगृहीत करून स्वच्छ कराव्यात अनेक नागरीकांनी माझे वार्डात बेटरमेंन्ट चार्जेस भरणा केलेले आहे. सुविधा देत नाही. पाणीपटटीच्या माध्यमातून येणारा पैसा पाणी पुरवठयावरच खर्च करावा कत्तलखाना पाण्याची टाकी नेहमी रिकामी असते तेथे मोठी दुर्गधी सुटते नागरीकांना मोठा त्रास होतो. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :ज्या ज्या भागात पाणी असलेल्या विहीरी अधिगृहीत करून त्यातील साफसफाई करून बाजूच्या परीसरात जे बेटरमेंन्ट चार्जेस भरणा करतात त्यांना पाणी दिले जात नाही अशांना तेथून पाणी देण्याची व्यवस्था करावी |
| मा.महापौर | :पडेगाव मिटमिटा या भागासह इतर शहरातील भागात पाणी असलेल्या विहिरी प्रशासनाने अधिगृहीत कराव्यात नियमीत त्या भागातील लोकांना पाणी मिळेल अशी व्यवस्था करावी. |
| श्री.कचरू मोरे | :वार्ड ९२ मध्ये पाण्याच्या लहान पाईपलाईन असून त्या बंद पडलेल्या आहे. राजू संधा नावाचे ज्युनिअर इंजिनियर यांनी तपासणी केली असता एका ठिकाणी व्हॉल टाकण्याची गरज आहे जेथे पाणी येत नाही तो भाग उंचावर असल्याने व व्हॉल नसल्यामूळे पाणी पुढे न जाता उताराच्या मार्गाने जाते या कामाची संचिका मा.आयुक्तांकडे आहे त्यास मान्यता देण्याचे आदेशीत करावे. |

| | |
|---|---|
| मा.महापौर | :सदर कामास मान्यता देवून त्या भागात पाणी मिळेल अशी कार्यवाही करावी स.सदस्या सौ.रजनी जोशी यांचे वार्डात ड्रेनेज लाईनचा प्रश्न आहे तोही सोडवावा. |
| सौ.लता दलाल | :मागिल बैठकीत प्रश्न विचारला होता. त्यावेळेस सांगण्यात आलेकी, नाला सफाईचे टेंडर काढले व सर्व नाले साफसफाई केले असे सांगण्यात आले. नाल्यातील गाळ तसाच बाजूला दिसून येतो परीमिती अशी होते ड्रेनेजच्या लाईन मध्ये तो गाळ जातो त्यामूळे त्या लाईन चोकअप होवून उघडयावर नाल्यात पाणी वाहते.यासाठी काय उपाययोजना केली ३० लाखाचे टेंडरचे काम योजना आखली. किती नाले साफ झाले. त्यावेळी पुर्ण गाळ निघाला नाही. वरचा कचरा जशाला तसाच होता.गाळ माती ने बाजुला लावली. पाऊस झाला तर. |
| मा.महापौर | :नाले सफाई बाबत किती रक्कमेचे टेंडर काढले किती नाले साफसफाई केले काढलेला गाळ उचलला का प्रशासनाने माहिती दयावी. |
| कार्य.अभियंता (अ व ड) | :पावसाळयापूर्वी नाले सफाई वार्ड अ व ड मधील कामे हाती घेतले होते.पावसापूर्वी सर्व नाल्याची सफाई यंत्राद्वारे मनुष्यबळा मार्फत केली होती त्यावर पुन्हा पाउस झाला नाल्यात पुन्हा घाण असेल तर काढली जाईल तसेच नाल्याच्या काठावर जेथे कचरा असेल त्याची पाहणी करून उचलण्याची कार्यवाही होईल. |
| सौ.लता दलाल | :नाल्यातील कचरा काढला. गाळ तसाच आहे त्यामूळे लोकांच्या घरात पाणी गेले. |
| कार्य.अभियंता(अ व ड) | :नाल्यातील पाण्याचा प्रवाह होईल एवढयापूरतेच काम हाती घेतले होते. सर्व नाला साफ करण्यासाठी खूप मोठा खर्च येईल. |
| श्री.अ.रशिद खान | :नाल्यातील कचरा काढला परंतू बाजूलाच टाकला उचलला गेला नाही पावसामूळे नाल्याच्या प्रवाहामध्ये पुन्हा तो मध्ये आला कचरा उचलला असेल तर कुणी व किती ट्रक उचलला व कोठे टाकला खुलासा करावा. |
| श्री.सतीष कटकटे | : ३० लक्षचे नाला सफाईच्या कामास स्थायी समितीने कार्योत्तर मंजूरी दिली प्रभाग निहाय कोणत्या प्रभागासाठी किती रक्कम खर्च करण्यात आली कोणते नाले साफ करण्यात आले.माझे माहिती प्रमाणे जाफरगेट औरंगपूरा औषधी भवनचा नाल्यातील कचरा काढला परंतु उचलला गेला नाही. |
| कार्य.अभियंता (अ व ड ) | :वार्ड अ व ड कार्यालय अंतर्गत १०-१० लक्षचे नाला सफाईचे २ टेंडर काढले होते कार्योत्तर मंजूरीने हे काम केले नाही त्यानुसार अजूनही काम चालू आहे पावसाळयाचे पुर्ण दिवसात जसे आताच म्हटल्या प्रमाणे पुन्हा नाल्यात कचरा दिसून येतो अशाप्रकारे केंव्हाही परीस्थिती निर्माण झाल्यास काम करून घेतल्यानंतर संबधीतास पेमेंन्ट दिले जाईल. |
| श्री.अनिल जैस्वाल | :माझे वार्डात ०३ मिनिटे पाणी येते एक विहिर असून त्यासाठी १० लक्ष खर्च केले सध्य स्थितीत मोटार नादुरूस्त असून ४ वर्ष उलटले नागरीकांना तेथून पाणी पुरवठा होवू शकला नाही. |
| मा.महापौर | :नियोजन करावे. |

कार्य.अभियंता(ब व क)	:या वार्डात जायकवाडीचा पाणी पुरवठा व्यवस्थीत होतो वार्डात एक विहिर असून कधी काळी पाणी पुरवठयाची स्कीम होती त्यातून ॲडीशनल पाणी पुरवठा करावा म्हणून नागरीकाची मागणी आहे.तेथील पंपीग मशीनरी बदलण्याचे अंदाजपत्रक केले त्यानंतर टेंडर झाल्यावर काम होईल.

श्री.मो.जावेद मो.इसहाक	:बजेटबुक केंव्हा तयार होणार व कामास सुरूवात केंव्हा होईल. माहिती घ्यावी.

मा.महापौर	:या ठिकाणी विहिरीवर त्वरीत विदयुत मोटार बसवून पाणी पुरवठा करण्याची व्यवस्था करावी.

**विषय क्र. ५९८ :**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचे आदेश क्र.बदली-१०.०८/प्र.क्र.२२/२००८/कोषा.(प्र.२) दि.३१.०५.२००८ नुसार श्री.वि.सो.जाधव,सहाय्यक संचालक (प्रशिक्षण), उपसंचालक लेखा कोषागारे, औरंगाबाद यांची मुख्य लेखा परिक्षक,महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रशासकीय कारणास्तव प्रतिनियूक्तीच्या विहीत अटी व शर्तीनुसार प्रथमतः एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियूक्तीने नेमणूक करण्यात आली आहे.

त्याप्रमाणे श्री.वि.सो.जाधव,यांना मुख्य लेखा परिक्षक या पदावर दि.५.६.२००८ रोजी मध्यान्हपूर्व रूजू करून घेण्यांत आले. दि.२.८.२००७ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे विषय क्र.२६३ नुसार दि.५.६.२००८ पासून एक वर्षाच्या प्रतिनियूक्तीच्या कालावधीसाठी ठराव मंजूर केलेला आहे. सदर प्रतिनियूक्तीचा कालावधी दि.४.६.२००९ रोजी संपलेला असल्यामूळे व महापालिकेला त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांचा प्रतिनियूक्ती कालावधी दि.५.६.२००९ पासून पूढील एक वर्षाकरीता प्रतिनियूक्तीच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता व्हावी.

श्री.गजानन बारवाल	:मागिल एक वर्षात मुख्य लेखा परीक्षक श्री.विलास जाधव यांनी चांगले काम केलेले आहे या विषयास मंजूरी दयावी.

मा.महापौर	:हा विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.वि.सो.जाधव,सहाय्यक संचालक (प्रशिक्षण), उपसंचालक लेखा कोषागारे,औरंगाबाद यांची मुख्य लेखा परिक्षक,महानगरपालिका औरंगाबाद या पदावर दि.५.६.२००९ पासून पूढील एक वर्षाकरीता प्रतिनियूक्तीचा कालावधी वाढविणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९९ :**

दिनांक ०४.०७.२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र.२३ अन्वये महानगरपालिकेच्या मालकीचे सिडको एन-३ उद्यानाजवळील खूली जागा एकूण क्षेत्रफळ २३१८.९४ चौ.मी. पैकी श्री.अशोक उजळंबकर यांनी मागणी केल्यानुसार कै.नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालय या इमारतीकरीता क्षेत्र १८६ चौ.मी.जागा महानगरपालिकेच्या प्रचलीत अटी शर्ती नुसार प्रथम तीन वर्षासाठी भाडे तत्वावर देण्यास मंजूरी देण्यांत येते. तसेच सदर बाब धोरणात्मक निर्णयाची असल्यामूळे संस्थेस जागा देण्यास मंजूरी देवून सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यात येते.

**मुळ प्रस्ताव खालीलप्रमाणे :**

मा.आयुक्त यांचे मंजूरीनुसार उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेच्या मालकीचे सिडको एन-३ उद्यानाजवळील खुली जागा एकूण क्षेत्रफळ २३१८.९४ चौ.मी. असून सदर जागा श्री.अशोक उजळंबकर यांनी कै.नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालय या इमारतीकरीता क्षेत्र २३१८.९४ चौ.मी.जागा भाडे तत्वावर मिळण्यासाठी विनंती अर्ज केला होता.

सिडको एन-३ येथील उद्यानाजवळील खुल्या जागेचे क्षेत्र २३१८.९४ चौ.मी. असून त्याचे भाडे कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत काढण्यात आलेले आहे. त्यानुसार भाडे रक्कम रू.२६/- प्रति चौ.मी.प्रतीमाह प्रमाणे एक महिन्याचे भाडे रक्कम रू.६०,२९२/- प्रमाणे प्रशासकीय मान्यता मिळाली होती. परंतू संबंधीत अर्जदार श्री.अशोक उजळंबकर यांनी कै.नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालय करीता क्षेत्र २०० चौ.मी.मिळण्याकरीता पुन्हा मा.आयुक्त यांचेकडे विनंती अर्ज केला आहे.

तरी सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे खुल्या जागेचे क्षेत्र २३१८.९४ चौ.मी.प्रमाणे रक्कम रू.२६/- प्रती चौ.मी.प्रती माह प्रमाणे एक महिन्याचे भाडे रू.६२,२९२/- नुसार प्रशासकीय मान्यता मिळाली होती. संबंधीताने विनंती अर्ज केल्यानुसार १८६ चौ.मी. जागा मागणी केलेली आहे. अर्जदारास सदरील जागा रू.२६/- प्रती चौ.मी.प्रती माह प्रमाणे भाडे रक्कम रू.४८३६/- प्रती माह येते.

अर्जदाराला भाडे तत्वावर जागा देणे झाल्यास मासिक भाड्याच्या बारा पट अनामत रक्कम आकारून सदरील जागा महानगरपालिकेच्या प्रचलीत अटी शर्तीनुसार प्रथम तीन वर्षासाठी भाडे तत्वावर देण्याच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.गजानन बारवाल :स्थायी समितीकडून आलेला प्रस्ताव आहे ३ वर्षच भाडे तत्वावर जागा देण्यात यावी असे म्हटले.ऑलरेडी या संस्थेला कलकत्त्याहून फंड मिळतो त्यातून इमारत बांधून महापालिकेस हॅडवर्क करणार आहे ३ वर्ष ऐवजी ३३ वर्षासाठी भाडे तत्वावर देण्यात यावे.तर या संस्थेस काही करता येईल.

श्री.प्रशांत देसरडा :R.R. फाऊडेशन हे संस्थेस वाचनालय बांधण्यासाठी ३० लक्षची मदत करीत आहे. ३३ वर्षाच्या लीजवर जागा असावी अशी त्यांची अट आहे. ३३ वर्षानंतर बांधलेली इमारत ही महापालिकेला हस्तांतर करणार आहे जे भाडे लागणार आहे खरे पाहता वाचनालय व्यवस्था करण्याचे काम महापालिकेचे आहे हे वाचनालय महापालिकेच्या नियत्रंणाखाली चालणार आहे त्यासाठी नाममात्र भाडे तत्वावर व ३३ वर्षासाठी देण्यात यावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :पूर्ण जागा ६२,२९२ रू दर महा रेंन्ट प्रमाणे देण्यास तयार होतो १८६ चौ.मी. का मागणी करीत आहे उर्वरीत जागा कुणाच्या ताब्यात राहणार.स्थायी समितीने ३ वर्षासाठी देण्यास मान्यता दिली आपण ३३ वर्षा कशासाठी व असे करण्याचे अधिकार या सभागृहास आहेत का दुरूस्ती करायची असेल तर तसा दुरूस्त प्रस्ताव पुन्हा स्थायी समितीकडे पाठवावे मान्यता होईल.चर्चे नुसार ३ वर्षचे ३३ वर्ष लिजवर करणे योग्य नाही.नियमात बसून कार्यवाही व्हावी ३३ वर्ष करण्याचे अधिकार आपल्याला नाही प्रशासनाचा तसा दुरूस्त प्रस्ताव यावा त्यानंतर मंजूर करावे.नसता सभागृहावर प्रकरण येईल आपल्या सर्वांवर कार्यवाही होवू शकते.

श्री.गजानन बारवाल :३ वर्ष तर इमारत बांधण्यास लागेल. ३३ वर्षाच्या लिजवर दयावे बांधकामाचा खर्च महापालिकेला देण्याची गरज नाही ३३ वर्षा नंतर ती इमारत विनामूल्य महापालिकेला हस्तांतर होणार आहे. मंजूरी दयावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे : ३३ वर्षानंतर सदर जागा परत मिळविण्याची जबाबदारी कोणावर असणार आहे.

| | |
|---|---|
| श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय | :३३ वर्षाच्या लिज देण्याचे मंजूर करायचे असेल तर माझा विरोध नोंदवून घ्यावा. |
| श्री.अ.रशिद खान | :नियमानूसार कार्यवाही व्हावी. |
| श्री.रेणुकादास वैद्य: | :महापालिकेचे अनेक ठिकाणी सभागृह,हॉल,वाचनालय व इतर इमारती आहे त्या त्या भागात जस्ट एखादी संस्था किंवा नागरिकांची या मालमत्ता भाडेतत्वावर मागणी केल्यास कारण नसतांना देण्यास टाळाटाळ होते. अनेक इमारतीमध्ये उदघाटन झाल्यानंतर काही दिवसातच जुगार व इतर अवैध धंदे सुरू होतात ते होवू नये यासाठी अशा इमारती त्या त्या भागातील नागरीक किंवा संस्थेस कमी दराने भाडे तत्वावर देण्यास सुटसुटीत नियमावली करावी नागरीकांना त्रास होणार नाही व इमारतीचे पावित्र्य राखले जाईल. |
| डॉ.भागवत कराड | :अनेक वाचनालय सांस्कृतिक हॉल बांधले चालू केले कालांतराने ते बंद पडले कोटला कॉलनी भागात ३ वर्ष वाचनालय चालले नंतर बंद झाले, खाजगी संस्था किंवा व्यक्ती घेण्यास तयार असेल व ते चांगले चालणार असेल तर भाडे तत्त्वावर देण्यास हरकत नसावी. |
| श्री.हिम्मतराव दाभाडे | :जागेचे पजेशन असेल तर ती जागा खाली करता येत नाही. या व्यक्तीने इमारत बांधकाम केल्यानंतर मुदतीनंतर ती जागा परत मिळेल का अशा पध्दतीने जागा देता येते का कोणत्या नियमाने खुलासा घ्यावा. |
| मा.महापौर | :स्थायी समितीकडून हा प्रस्ताव तपासनी करून आला असे गृहीत धरता येईल. |
| श्री.मनमोहनसिंग आबेरॉय | :२६रू प्रति चौ.मी. दर दिले टपरी धारकाकडून ८ रू प्रमाणे घेतात श्रीमतांना २.६० रूने देतात. हे दर कुणी व कोणत्या नियमाने निश्चित केले.जागेच्या व्हॅल्यूच्या १५ टक्के भाडे आकारावे असे असे नियम आहे. |
| मा.महापौर | :माझे माहिती प्रमाणे टप-यांना परवानगी देणे बंद केले आहे भाडे घेत नाही. |
| श्री.संजय जोशी | : इन्कम होण्याच्या कामासाठी देत नसून वाचनालय सुरू होणार आहे. क्लब साठी देत नाही. भाडे तत्वावर जागा मागणी केली त्यांचे खर्चाचे ३० लक्षची इमारत बांधणार मुदतीनंतर विनामूल्य महापालिकेस देणार आहे वाचनालयाची फिस १०-५ रूपेक्षा जास्त मिळत नाही परंतु अजन्म डिपॉजीट जमा राहील. ३३ वर्षाच्या भाडे तत्त्वावर देण्यास हरकत नसावी. |
| हिम्मतराव दाभाडे | :जबाबदारी कोण घेणार. |
| श्री.अ.रशिद खान | :३० लक्षची इमारत बांधणार यात उल्लेख नाही. कोटुण माहीत झोल नियमा प्रमाणे करावे. |
| श्री.गजानन बारवाल | :संबधीत व्यक्ती हे जेष्ठ पत्रकार आहे त्यांनी आपणास व मा.आयुक्तास पत्र दिले आहे. |
| श्री.महेश मांळवतकर | :सिडको भागात कम्युनिटी सेंटर असून तेथे गोरगरीबांचे कमी दरात लग्नसमारंभ होत होते. हस्तांतरण झाले ३ वर्षापासून त्या सेंन्टरची दरवाजे खिडक्या तुटल्या कार्यक्रमासाठी धेतल्यास पाणी व इतर साहित्य बाहेरून आणावे लागते यात महापालिकेची सेवा म्हणून उददेश सफल होतो का अनेक वेळा येथील कामाची दुरूस्ती व्हावी |

मागणी केली कार्यवाही केली नाही गरीबांचे लग्न मोठया मंगल कार्यालयात होत नाही. मनपाचे ताठे मंगलकार्यालय १८०००रू दयावे लागतात गरिब व्यक्ती २०००/- भरू शकत नाही.यामूळे गरीबावर एका अर्थाने अन्याय होतो असेच म्हणावे लागेल.महापालिकेकडून येथील काम होत नसेल तर कुणालातरी चालवण्यासाठी दयावे गोरगरीबांना सुविधा होईल असे काम करावे खाजगीत लोक महापालिकेला नाव ठेवतात आमच्या भागातील गोरगरीबांसाठीचे प्रश्न सुटले पाहिजे तरच या सभागृह चालविण्याला अर्थ आहे.

श्री.अ.रशिद खान :कम्युनिटी सेंन्टर केले तर सुविधा देणे आवश्यक आहे परंतू इमारत महापालिकेची त्यास स.सदस्यांचे वडीलांचे नाव दिले जाते त्यांचे काम देखील पाहण्यात यावे. महानगरपालिका इमारतीवर खर्च करणर नाव मात्र वडिलांचे दयायचे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :वाचनालयाचा विषय आहे एन २ कम्युनिटी सेंन्टरमध्ये ऑलरेडी हे वाचनालय चालते. तेथील डिस्टर्ब टाळण्यासाठी सुयोग्य जागा नाही. एन-३उद्यानाच्या बाजुला जागा मागितली.ॲक्टव्हिटी महानगरपालिकेची आहे,कलकत्ता येथील संस्थेशी महापालिकेने पत्रव्यवहार करावा इमारत बांधणीसाठी अनुदान घ्यावे श्री अढळकर यांना मोफत केअर टेकर म्हणूण घ्यावे सदरचे कम्युनिटी सेंटर कोण चालवते कोणत्या कामासाठी व त्यांचे मुळ मालक कोण कम्युनिटी सेंन्टर गरीब व मध्यम वर्गीय लोकांच्या उपयोगात यावे सिडकोचे दराने देणेचा विचार व्हावा.

श्री.प्रंशात देसरडा :कम्युनीटी सेंटर हस्तांतर झाले. जेवढे कम्युनिटी सेंटर बांधले अल्पदरात देऊन कोटयावधी कमविले. हस्तांतरण होवून ४ वर्ष झाले महापालिकेने भाडेने दिले नाही. हस्तांतराच्या वेळी चालू होते आज तेथे पत्ते खेळतात.वास्तू चांगल्या अवस्थेत नाही तेथे डुकरे मांजरे फिरतात गाजर गवत वाढलेले आहे दुर्दैव, अवस्था चांगली नाही ज्वलंत प्रश्न आहे, यामूळे महापालिकेचे उत्पन्न बुडत आहे यास जबाबदार कोण. सिडकोकडून मिळालेल्या सर्व वास्तूचा वापर व महापालिकेस उत्पन्न कसे मिळेल या संदर्भात योग्य निर्णय घेणेसाठी आपल्या दालनात अधिकारी पदाधिकारी यांचे समवेत एक बैठक आयोजित करून हा प्रश्न मार्गी लावावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :प्रशासनाने ३ वर्षात का भाडयाने दिले नाही. पुढे करा म्हणतात मागे का केले नाही.

श्रीमती मेहरून्नीसा खान :प्रशासकीय खर्चातून बांधलेल्या वास्तुला सदस्यांचे वडीलांचे नाव देवू शकतो का?

श्री.अ.रशिद खान : ज्यांनी या देशासाठी,समाजासाठी काहीच केले नाही इमारत प्रशासकीय खर्चातून उभी केली अशा वास्तुला एखादा व्यक्तीचे नातेवईकाचे नाव देवू शकतो का? सिडकोत कम्युनिटी सेंन्टर सदस्यांचे वडीलांचे नाव देण्यात आले खुलासा व्हावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :हस्तांतरण होवून ३ वर्ष झाले आतापर्यत अशा इमारती भाडे तत्त्वावर का दिल्या नाही.

मालमत्ता अधिकारी : हस्तांतरणाच्या वेळी अनेक वास्तू महापालिकेकडे आल्या त्यातील ताठे मंगल कार्यालय-११,एन-९,एन-५ रामनगर,मुकुंदवाडी येथील हॉल चालविण्यासंबधी मालमत्ता विभागाकडून कार्यवाही होते कर्मचारी येथे

कार्यरत आहे. ताठे मंगल कार्यालयसाठी अनेकांची मागणी होते तारखा मिळत नाही अशी परीस्थिती आहे.

मा.महापौर :सिडको अल्पदरात कम्युनिटी सेंन्टर देत होते त्याच दराने आता का दिले जात नाही तेथे देखभाल दुरूस्ती का होत नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :स.श्री.बारवाल साहेबांनी सांगितले ते मंजूर करा. आम्ही थकलो काय करायचे ते करा.

श्री.प्रशांत देसरडा :सिडकोने दिलेले कम्युनिटी हॉल किती,भाडेने किती दिले, किती बंद आहे.

मालमत्ता अधि. :कम्युनिटी सेंन्टर व सभागृहाची माहिती या विभागाकउे आहे उवरीत वास्तुची जबाबदारी त्या त्या वार्ड कार्यालयाकडे दिलेली आहे.

श्री.प्रशांत देसरडा :सिडको एम-९ कम्युनिटी सेंन्टर असून अनेक लग्न व इतर कार्यक्रम तेथे झालेले आहे सध्या त्या वास्तुची अवस्था वाईट आहे.चांगले मेन्टनन्स करून भाडयाने का दिले जात नाही.

श्री.संतोष खेंडके :कम्युनिटी सेंन्टर भाडेने देणेची नागरीकांनी मागणी केलेली होती का?

मालमत्ता अधिकारी :कम्युनिटी सेंन्टर व मंगल कार्यालय मिळून असे चार इमारतीचा वापर या विभागाच्या मार्फत चालविले जाते उर्वरीत वास्तु त्या त्या वार्ड कार्यालय अंतर्गत दिलेले आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : ४ इमारती कोणत्या व कुणाच्या देखदेखी खाली चालतात किती उत्पन्न येते किती कर्मचारी काम करतात.

मालमत्ता अधिकारी :एन-११ ताठे मंगल कार्यालय- येथे ४,एन-५ सभागृह -२,एन-९ एम-२ कम्युनिटी सेंन्टर १, एन-९ रामनगर मुंकूदवाडी हॉलवर १ असे वर्ग ४ संवर्गातील कर्मचारी कार्यरत आहे. त्यांचेकडून बुंकीग व साफसफाईची कामे करून घेतली जातात.कोणत्या वास्तुला काय नाव दयायचे हे प्रशासन ठरवत नाही, नाव देण्याचा प्रस्ताव सभागृहासमोर येतो तो मंजूर झाल्यानंतर त्या प्रमाणे नाव दिले जाते.

श्री.काशिनाथ कोकाटे : ताठे मंगल कार्यालयाचा खुलासा मान्य आहे परंतू ०३ कम्युनिटी सेंन्टरचे ३ वर्षात किती उत्पन्न झाले,कोणती एजन्सी काम करते, लाईट बील किती भरणा केले,नळ कनेक्शन किती व कोणत्या प्रकारचे कर्मचारी किती व ते काय काम करतात त्यांना कोणते काम दयायला पाहिजे त्याचे अधिकार कोणते. सविस्तर माहिती दयावी.

श्रीमती मेहरून्नीसा खान :शहरात शादीखाने,मंगल कार्यालय किती विचारणा केली असता माहिती दिली जात नाही. प्रत्येक शादीखाना,मंगलकार्यालयास ५० हजार टॅक्स आकारणी केली पाहिजे शहराचा विकास त्यातून बराचसा होवू शकेल.

श्री.रेणुकादास वैद्य :करोडोचे उत्पन्न महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामूळे बुडते असे या चर्चेवरून निष्पन्न होते.मागिल पंचवार्षिकमध्ये मा.आमदार विलास अवचट यांचे निधीतून श्रेयनगर भागात सभागृह बांधले महापालिकेकडे हस्तांतर केले.या भागातील गिता स्वाध्याय परीवार नावाची एक संस्थेने ३ वर्षापासून वेळोवेळी भाडेने देणे बाबत मागणी केले सर्व पुर्तता झालेली असतांना त्यांना सभागृह दिले नाही.३ वर्षाचे भाडेपोटी येणारा महसूल बुडाला यात जे दोषी असेल त्यांचे पगारातून रक्कम वसुली करावी ज्या ज्या इमारतीची मागणी केली व त्या कार्यकाळात जे अधिकारी असेल त्यांनी अशा इमारती देण्याची

कार्यवाही न केल्यास बुडणारा महसूल त्या त्या अधिकाऱ्याच्या पगारातून वसूल करावा.

मा.महापौर :सिडको कम्युनिटी सेंन्टर हे गरीबासाठी अतिशय सोयीचे व कमी दरामध्ये दिले जात होते. स.सदस्यांच्या भावना तिव्र आहेत. महापालिकेचे उत्पन्नाचे एक साधन असून गोरगरिबाचे सेवेचे एक प्रकारचे अंग आहे. परंतु याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले सुसंगती वाटत नाही. अधिका-यांनी केलेले निवेदन अपुरे होते समाधानकारक नाही. प्रशासनाने येणा-या थोडया कालावधीत या संपूर्ण मालमत्तेचा सर्वे करून माहिती घ्यावी.व जनतेच्या सेवेसाठी देता येईल सर्व व्यवस्था राहिल याचा समन्वय ठेवावा आताच म्हटल्या प्रमाणे श्रेयनगर येथील सभागृह तेथील जेष्ठ नागरीकांनी ३ वर्षापासून मागणी करीत आहे कार्यवाही झाली नाही सदर सभागृह व इतर ठिकाणचे ज्या वास्तु असतील त्या देणे साठी महापालिकेच्या नियमाला अधिन राहून त्यासाठी सुटसुटीत नियम करावे.विषय क्र.५९९ मध्ये नाममात्र भाडेने देवून R.R.फाऊडेशन या संस्थेकडून बांधकामासाठी निधी येत आहे व अतिशय चांगला प्रस्ताव असल्याने ३३ वर्षाचे कराराकरीता महापालिकेच्या संपूर्ण नियमाच्या अधिन राहून या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

श्री.त्र्यंबक तुपे :खासदार,आमदार निधीतून अनेक व्यायाम शाळा बांधलेल्या आहे त्यांची वाईट अवस्था आहे त्याकडे लक्ष देवून भाडे तत्वावर दिल्यास उत्पन्न येईल तसेच अनेक शॉपीग सेंटर रिकामे आहे टेंडर काढले जाते परंतू दरामध्ये मोठी तफावत असते अटी जाचक असल्याने पुढे येत नाही.त्या संबधीचे काही नियम शिथील करून भाडेने देण्याची कार्यवाही करावी.

मा.महापौर :अनेक व्यायाम शाळा तसेच सभागृह खासदार,आमदार निधीतून बांधण्यात आले त्याची परीस्थिती वाईट आहे.अशा वास्तु तेथील लेआऊट धारक किंवा इतर संस्थानी मागणी केले असेल तर सर्व नियमाच्या अधिन राहून नाममात्र भाडेने देण्या संदर्भात यापूर्वीच ठराव पारीत झाला त्याची अमलबजावणी अदयाप केली नाही ती करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेच्या मालकीचे सिडको एन-३ उद्यानाजवळील खूली जागा एकूण क्षेत्रफळ २३१८.९४ चौ.मी. पैकी श्री.अशोक उजळंबकर यांनी मागणी केल्यानुसार कै.नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालय या इमारतीकरीता क्षेत्र १८६ चौ.मी.जागा महानगरपालिकेच्या प्रचलीत अटी शर्ती नुसार ३३ वर्षासाठी भाडे तत्वावर महानगरपालिकेच्या संपूर्ण नियमाच्या अधिन राहून देण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.३७ च्या नविन खडी रस्ते शहरी भाग शिर्षकातील एस.बी.कॉलनी येथील पुलाचे १४.९० लक्षचे शिर्षक बदलणे. सदरील रक्कम ही स्वा.सैनिक कॉलनीच्या उत्तरेकडील बाजूची (फसील) संरक्षक भिंत पडली तेथील नागरीकांची तातडीची गरज पाहून वरील पैसे संरक्षक भिंत १० लाख व सदर निधी कॉलनी ते स्वा.सैनिक कॉलनीत नविन ड्रेनेज लाईन व देखभाल दुरूस्ती अंबा अप्सरा समोरील मुतारीसाठी ५ लक्ष ठेवणे.

सुचक : श्री.वसंत नरवडे पाटील अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

मा.महापौर : हा विषय मंजूर करण्यात येतो. महापालिकेकडे सुलभ शौच्छालय व इतर करीता निधी जमा असेल तर तो निधी तेथे वापरता येवू शकेल. जर जागा असेल तर असे सुलभ शौच्छालय अशा भागामध्ये करावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : ज्या ज्या ठिकाणी मोठ्या इमारती शॉपींग कॉम्प्लेक्स आहे, त्या ठिकाणी सुध्दा या योजनेमध्ये तेथील लोकांसाठी सुलभ शौच्छालय बांधता येत असेल तर कार्यवाही करावी. त्याची आवश्यकता आहे.

मा.महापौर : प्रशासनाने तशा पध्दतीच्या जागा शोधाव्या अशा काही जागा शोधून यापूर्वी सुलभ शौच्छालय बांधलेली आहे, आणखी त्यात वाढ करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३७ च्या नविन खडी रस्ते शहरी भाग शिर्षकातील एस.बी.कॉलनी येथील पुलासाठी असलेली तरतूद रू.१४.९० लक्ष हे स्वा.सैनिक कॉलनीच्या उत्तरेकडील बाजूची (फसील) संरक्षक भिंत बांधणेसाठी व स्वा.सैनिक कॉलनीत नविन ड्रेनेज लाईन व देखभाल दुरूस्ती अंबा अप्सरा समोरील मुतारीसाठी लेखाशिर्ष बदलणेस मान्यता देण्यांत येते. तसेच महापालिकेकडे सुलभ शौच्छालय व इतर करीता निधी जमा असेल तर तो निधी तेथे वापरता येवू शकेल. जर जागा असेल तर असे सुलभ शौच्छालय अशा भागामध्ये करणेस आणि प्रशासनाने तशा पध्दतीच्या जागा शोधाव्या अशा काही जागा शोधून यापूर्वी सुलभ शौच्छालय बांधलेली आहे, आणखी त्यात वाढ करावी. यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मनपा शहर बस सेवा ही दि.२६.०१.२००६ रोजी चालू झालेली आहे. दि.०७.०७.२००६ रोजी तत्कालीन महापौर तनवाणी साहेबांनी मनपाच्या सभागृहात एक कार्यक्रम घेवून मनपा शहर बस सेवेतर्फे शहरातील विद्यार्थी व अपंगांना तिकीटाच्या दरामध्ये ५० टक्के सवलत देणे बाबत घोषणा केली होती. तसेच काही विद्यार्थ्यांना सवलतीचे पासेस देवून पास सवलतीला सुरूवात केली. या कार्यक्रमात सवलतीच्या पाससाठी ५० टक्के रक्कम मनपातर्फे देण्यात येईल असे ठरले होते.

आज रोजी पर्यंत अकोला प्रवासी व माल वाहतुक सहकारी संस्था यांनी दि.११.१०.२००६, दि.२९.११.२००६ व दि.१२.१२.२००६ असा पत्र व्यवहार करून सुध्दा दि.०७.०७.२००६ पासून आज रोजीपर्यंत सवलतीतील ५० टक्के फरकाची रक्कम सदरील संस्थेस मिळाली नाही. तेंव्हा प्रशासनाने संस्थेस परतावा देण्यासाठी लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : श्री.प्रशांत देसरडा अनुमोदक : श्री.नारायण कुचे

**संवाद :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : विषय फायनांशीयल आहे, प्रशासनाकडून प्रस्ताव यावा.

श्री.गजानन बारवाल : ५० टक्के सवलत देण्याचे ठरले होते त्या विदयार्थ्यांना रक्कम मिळाली नाही म्हणून त्यांनी स.सदस्यांकडे पत्र दिलेले होते. त्यामुळे प्रस्ताव ठेवला विचार करावा मंजूरी दयावी.

श्री.प्रशांत देसरडा विदयार्थी,अपंगाना तसेच स्वातंत्र्य सैनिकांना ५० टक्के मोफत बस सेवेचे पासेस दयावे म्हणून या सभागृहात कार्यक्रम घेतला होता. संबधीत संस्थेने २००६ पासून जो ५० टक्केचे फरकाच्या रक्कमेची अनेक वेळा मागणी केली. रक्कम मिळाली नाही तर पासेसची सवलत बंद केली जाईल अशा प्रकारची नोटीस आलेली आहे.अपंग, शालेय विदयार्थी व स्वातत्र्य संनिकांच्या हितासाठी निर्णय घेतला होता प्रशासनाने कार्यवाही न केल्याने प्रस्ताव ठेवला कळकळ वाटत असेल तर मंजुर करा.

| | |
|---|---|
| मा.महापौर | :या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.प्रशासनाने तपासणी करून योग्य कार्यवाही करावी. |
| श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय | :आमचा विरोध नोंदवून घ्यावा. |
| मा.महापौर | :प्रशासनाने तशी नोंद घ्यावी. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा शहर बस सेवा दि.२६.०१.२००६ रोजी चालू झालेली असल्यामूळे, व दि.०७.०७.२००६ रोजी तत्कालीन महापौर यांनी महापालिकेच्या सभागृहात एक कार्यक्रम घेवून मनपा शहर बस सेवेतर्फे शहरातील विद्यार्थी व अपंगांना तिकीटाच्या दरामध्ये ५० टक्के सवलत देणे बाबत घोषणा केली होती. तसेच काही विद्यार्थ्यांना सवलतीचे पासेस देवून पास सवलतीला सुरूवात केली, या कार्यक्रमात सवलतीच्या पाससाठी ५० टक्के रक्कम महापालिकेतर्फे देण्यात येईल असे ठरल्यामूळे, दि.०७.०७.२००६ पासून आज रोजीपर्यंत सवलतीतील ५० टक्के फरकाची रक्कम सदरील संस्थेस प्रशासनाने परतावा देण्यास तपासणी करून योग्य ती कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.१२ कबीरनगर या वार्डामध्ये छोटा मुरलीधर नगर ही वसाहत आहे. या वसाहतीमध्ये जो चौक आहे त्यास लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नांव देण्यात यावे याकरीता सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.के.व्ही.मोरे

अनुमोदक : श्री.कचरू सोनवणे,श्री.हिम्मतराव दाभाडे,श्री.अशोक विरकर

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :नाव देण्यासाठी कमेटी आहे एकाच इमारतीला,रस्त्याला, चौकाला अनेक वेळा नावे देण्यात येतात.यासाठी नियमावली करावी जवळचे नातेवाईक किंवा कोणतेही कार्य न केलेल्या व्यक्तीची नावे देवू नये.आतापर्यत जी जी नावे देण्यात आली त्याची यादी तयार करावी. जेथे नाव दिलेले नसेल तेथे दयावे. विकास कामे होण्याऐवजी नामांतरचजास्त होत आहे योग्य वाटत असेल तेच करावे विकासाचे प्रस्ताव मंजूर करावे. |
| श्री.अ.रशिद खान | :कोणत्या ठिकाणी काय नाव देण्यात आले याची यादी तयार करावी. विकास कमी नावाचे प्रस्ताव जास्त.नाव देणेसाठी की विकासासाठी सभा असते पब्लीक विचारणा करतात.आमचा विरोध आहे. |
| श्री.प्रशांत देसरडा | :जे नाव सुचवले त्याविषयी वाद नाही मंजूरी देण्यात यावी. |
| मा.महापौर | :नावाचे प्रस्ताव ठेवतांना तेथील जनतेच्या भावनाचा आदर करूनच प्रस्ताव आणावा.हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो यापुर्वी अनेक इमारती, रस्ता,चौकास नावे दिली आहे पुन्हा याच ठिकाणी नाव देण्याचा प्रस्ताव येवू नये.स.सदस्य हे प्रस्तावाचे सुचक अनुमोदक असतांना विनंती की त्यांनी त्यांचे नातेवाईकाचे नाव देण्याचे प्रस्ताव देणे संयुक्तीक होणार नाही. जे नाव येईल ते सर्वमान्य असावे.त्या व्यक्तीच्या कार्याची आठवण करून देणारे असावे. असा उद्येश असावा या दृष्टीने प्रस्ताव यावे. कोणत्या इमारतीला रस्त्याला चौकास नाव दिलेले आहे, त्याची माहिती नगरसचिव यांनी तयार करून पुढील सभेत ठेवावी. |
| श्री.सलीम पटेल | : जे स.सदस्य सुचक व अनुमोदक असतील त्यांनी त्यांचे जवळचे नातेवाईकाचे नाव देण्याचा प्रस्ताव दिला असेल तर त्यांचे नगरसेवक पद सुध्दा रद्य होवू शकते. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१२ कबीरनगर या वार्डामधील छोटा मुरलीधरनगर वसाहतीमधील चौकास लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नांव देण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.४९ मध्ये माजी नगरसेवक नरेंद्र पाटील यांच्या निधीतून बांधलेली पाणपोई या पाणपोई पासून ते मा.श्री.आमदार डॉ.कल्याण काळे यांच्या घरापर्यंत जाणाऱ्या ग्रिन बेल्ट (बायपास मार्ग) या मार्गाला स्व.वैजनाथ किसनराव काळे पाटील हे नांव देण्यात यावे. तसेच वॉर्ड क्र.४९ मध्ये मनपाचे कम्युनिटी हॉलला संत गाडगे महाराज हे नांव देण्यांत यावे. प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.अशोक गोरखनाथ विरकर अनुमोदक : श्री.विनायक पांडे

मा.महापौर : विषय क्र.६०३ ते ३१० मंजूर करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९ मध्ये माजी नगरसेवक नरेंद्र पाटील यांच्या निधीतून बांधलेली पाणपोई या पाणपोई पासून ते मा.श्री.आमदार डॉ.कल्याण काळे यांच्या घरापर्यंत जाणाऱ्या ग्रिनबेल्ट (बायपास मार्ग) या मार्गाला स्व.वैजनाथ किसनराव काळे पाटील हे नांव देण्यास तसेच वॉर्ड क्र.४९ मध्ये मनपाचे कम्युनिटी हॉलला संत गाडगे महाराज हे नांव देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,वॉर्डक्र.४९मध्ये मा.श्री.डॉ.कल्याणराव काळे यांच्या घरापासून ते कुलस्वामीनी मंगलकार्यालय (आझाद चौक) पर्यंत राष्ट्र संत सेनाजी महाराज यांना मानणारे अनेक समाजबांधव आहे.तसेच राष्ट्रसंत सेनाजी महाराज यांचे नांव औरंगाबाद शहरामध्ये कूठेच नाही.

मा.श्री.आमदार कल्याणराव काळे यांच्या घरापासून ते लोकसेवा जनरल स्टोअर्स बाजूने कुलस्वामीनी मंगल कार्यालय (आझाद चौक) पर्यंत या मार्गाला राष्ट्रसंत सेनाजी महाराज मार्ग हे नांव देण्यात यावे.

सुचक : श्री.अशोक गोरखनाथ विरकर अनुमोदक : श्री.महेश माळवतकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९ मधील मा.श्री.आमदार कल्याणराव काळे यांच्या घरापासून ते लोकसेवा जनरल स्टोअर्स बाजूने कुलस्वामीनी मंगल कार्यालय (आझाद चौक) पर्यंत या मार्गाला राष्ट्रसंत सेनाजी महाराज मार्ग नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.४९ मध्ये सिडको नाट्यमंदीर समोरील के.सेक्टर ई सेक्टर लगत असलेला चौक या चौकाला राजमाता जिजाऊ चौक असे नांव देण्यात यावे. तसेच वॉर्ड क्र.४९ मध्ये सिध्दार्थ चौक (अविष्कार चौक) ते सिडको नाट्य मंदिरकडे जाणाऱ्या मार्गाला वंदेमातरम् असे नांव देण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.अशोक गोरखनाथ विरकर

अनुमोदक : श्री.के.व्ही.मोरे,श्री.सतिष कटकटे,श्री.अनिल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९ मध्ये सिडको नाट्यमंदीर समोरील के.सेक्टर ई सेक्टर लगत असलेला चौक या चौकाला राजमाता जिजाऊ चौक असे नांव देण्यास तसेच वॉर्ड क्र.४९ मध्ये सिध्दार्थ चौक (अविष्कार चौक) ते सिडको नाट्य मंदिरकडे जाणाऱ्या मार्गाला वंदेमातरम् असे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, एन-१ आणि एन-५ यांना जोडणाऱ्या रस्ता सिडको ऑफिस शेजारी फेम तापडीया समोरील चौकाला श्री.परशुराम हे नांव देण्यांत यावे. व देवगिरी बँक समोर माता मंदिर जाणाऱ्या मार्गाला महाराणा प्रताप मार्ग हे नांव देण्यांत यावे. तसेच पी-११ व एसबी बँक क्वॉर्टर्स समोरील ते गुप्ता एस.टी.डी.कडे जाणाऱ्या अंतर्गत रोडला महात्मा फुले मार्ग हे नांव देण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.अशोक गोरखनाथ विरकर

अनुमोदक : श्री.भाऊसाहेब ताठे,श्री.सतिष कटकटे,श्री.अनिल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-१ आणि एन-५ यांना जोडणारा रस्ता सिडको ऑफिस शेजारील फेम तापडीया समोरील चौकाला श्री.परशुराम हे नांव देण्यांस व देवगिरी बँक समोर माता मंदिर जाणाऱ्या मार्गाला महाराणा प्रताप मार्ग हे नांव देण्यांस तसेच पी-११ व एसबी बँक क्वॉर्टर्स समोरील ते गुप्ता एस.टी.डी.कडे जाणाऱ्या अंतर्गत रोडला महात्मा फुले मार्ग हे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.इएसटी-२००५/प्र.क्र.४१ पा.पु.२३ दिनांक ८.९.२००५ अन्वये वीज पर्यवेक्षक या पदाची वेतनश्रेणी रू.४५००-१२५-७००० ऐवजी रू.५०००-१५०-८००० ही वेतनश्रेणी दिनांक १.१.१९९६ पासून लागू करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार मनपातील पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी श्री.एस.एल.मोटकर यांना कालबध्द पदोन्नतीत १.१.१९९६ पासून लागू करण्यात आलेली असल्यामूळे मनपातील विद्युत पर्यवेक्षक या पदाची वेतनश्रेणी रू.४५००-१२५-७००० ऐवजी रू.५०००-१५०-८००० अशी १.१.१९९६ पासून पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.गजानन रामकिशन बारवाल अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.इएसटी-२००५/प्र.क्र.४१ पा.पु.२३ दिनांक ८.९.२००५ अन्वये वीज पर्यवेक्षक या पदाची वेतनश्रेणी रू.४५००-१२५-७००० ऐवजी रू.५०००-१५०-८००० ही वेतनश्रेणी दिनांक १.१.१९९६ पासून लागू करण्यास मंजूरी देण्यात आलेली असल्यामूळे, मनपातील विद्युत पर्यवेक्षक या पदाची वेतनश्रेणी रू.४५००-१२५-७००० ऐवजी रू.५०००-१५०-८००० अशी १.१.१९९६ पासून पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, वार्ड क्रमांक ४९ मध्ये अरूणोउदय कॉलनी बौध्द विहारा समोरील नियोजित सभा मंडपाला मातोश्री रमाबाई आंबेडकर असे नाव देण्यात यावे. तसेच वार्ड क्रमांक ४९ मध्ये चेतना किराणा दुकाना पासुन ते सिडको नाटय मंदीराकडे जाणाऱ्या मार्गाला संत सिरोमणी नरहरी महाराज हे नाव देण्यात यावे.

सुचक :श्री.अशोक गो.विरकर,श्री.सतिष कटकटे

अनुमोदक : श्री.के.व्ही.मोरे,श्री.अनिल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्रमांक ४९ मध्ये अरूणोउदय कॉलनी बौध्द विहारा समोरील नियोजित सभा मंडपाला मातोश्री रमाबाई आंबेडकर असे नाव देण्यास तसेच वार्ड क्रमांक ४९ मध्ये चेतना किराणा दुकानापासुन ते सिडको नाटय मंदीराकडे जाणाऱ्या मार्गाला संत सिरोमणी नरहरी महाराज हे नाव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, वार्ड क्रमांक ४९ मध्ये भोला पान सेंटर ते सिडको नाटय मंदिराकडे जाणाऱ्या मार्गाला संत भगवान बाबा असे नांव देण्यात यावे. तसेच वार्ड क्रमांक ४९ मध्ये धर्मवीर शाळे समोरील सावरकर नगर येथील चौकाला वि.दा.सावरकर असे नाव देण्यात यावे.

सुचक :श्री.अशोक गो.विरकर,श्री.सतिष कटकटे अनुमोदक :श्री.के.व्ही.मोरे,श्री.अनिल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्रमांक ४९ मध्ये भोला पान सेंटर ते सिडको नाटय मंदिराकडे जाणाऱ्या मार्गाला संत भगवान बाबा असे नांव देण्यास तसेच वार्ड क्रमांक ४९ मध्ये धर्मवीर शाळे समोरील सावरकर नगर येथील चौकाला वि.दा.सावरकर असे नाव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, वार्ड क्रमांक ५६ संजय नगर-जिन्सी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष् बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| SCR page No. १/२<br><br>Page No.४ | १) वॉर्ड क्र.२८ नेहरूनगरमध्ये ड्रेनेज लाईन टाकणे-५.००लक्ष<br>२) वॉर्ड क्र.२८ नेहरूनगरमध्ये ड्रेनेज लाईन टाकणे-३.०० लक्ष<br>३) वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर जलवाहिनी टाकणे-५.०० लक्ष | १. वॉर्ड क्र.२८ नेहरूनगरमध्ये नवीन पध्दतीचे लाईट बसविणे - १०.०० लक्ष<br>२. वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर मध्ये बोरींग करून हापसे बसविणे-३.०० लक्ष |

सुचक :श्री.खान मेहरून्नीसा हमीद खान अनुमोदक : श्रीमती सोफिया मोमीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.५६ संजयनगर-जिन्सी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालीलप्रमाणे लेखाशिर्ष् बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान नं | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| SCR page No. १/२<br><br>Page No.४ | १) वॉर्ड क्र.२८ नेहरूनगरमध्ये ड्रेनेज लाईन टाकणे-५.००लक्ष<br>२) वॉर्ड क्र.२८ नेहरूनगरमध्ये ड्रेनेज लाईन टाकणे-३.०० लक्ष<br>३) वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर जलवाहिनी टाकणे-५.०० लक्ष | १. वॉर्ड क्र.२८ नेहरूनगरमध्ये नवीन पध्दतीचे लाईट बसविणे - १०.०० लक्ष<br>२. वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर मध्ये बोरींग करून हापसे बसविणे-३.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, वार्ड क्रमांक ९६ मधील महानगरपालिकेच्या सिल्कमिल मोमीन कॉलनी येथील मंगल कार्यालयास येथील सामाजिक कार्य करणारे स्व.मोमीन सरदार खान यांचे नांव सदरील मंगल कार्यालयास देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्रीमती मोमीन सफिया अय्युब खान

अनुमोदक :श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद,श्रीमती खान अजरा जबीन,श्री.सीताराम सुरे

**संवाद :**

श्री.अ.रशिद खान मामु : यापूर्वी या इमारतीला काय नांव दिले होते, ते सुध्दा बघावे स.सदस्यांच्या सासऱ्याचे नांव देण्याचा प्रस्ताव आला, यात नगरसेवकांचे पद सुध्दा रद्द होवू शकते. पूर्वी काय नांव दिले होते, ते पहावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : यापूर्वी सर्व मंजूर केले, चौकशी होत राहील,हा विषयही मंजूर करावा.

श्री.गजानन बारवाल : हा ठराव मंजूर करायचा नसेल तर नका करू. अतिशय महत्वाची व्यक्ती आहे,त्या व्यक्तीबद्दल आदराची भावना आहे. त्या भागातील लोकांची वेगळी भावना आहे.मंजूर करायचा नसेल तर नका मंजूर करू.परंतू त्यांचेबद्दल अनादर करू नये. महत्वाची व्यक्ती आहे. त्याचा आदर वेगळा आहे, ती व्यक्ती हयात नाही.

याचवेळी सभागृहात मा.महापौर डायससमोर मोठमोठ्याने स.सदस्यांचे बोलणे चालू असते.

श्री.गजानन बारवाल : सदरील व्यक्तीबद्दल अतिशय आदर त्या भागामध्ये आहे.

मा.महापौर : या विषयासंबंधी माझ्याकडे काही सूचना आलेल्या आहे, त्या सभागृहामध्ये ठेवणे माझे काम आहे. यात माझे काहीच म्हणणे नाही, परंतू आपण कृपया मला सभागृहात माहिती ठेवू द्यावी.

सभागृहात मा.महापौर डायससमोर मोठमोठ्याने स.सदस्यांचे बोलणे चालू असते.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : सदर व्यक्ती कूठले रहिवाशी आहे.

मा.महापौर : कृपया सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. माझेकडे काही पत्र आलेले आहे, त्या विषयी सभागृहात मला सांगणे आवश्यक आहे. आता मी म्हटल्याप्रमाणे प्रस्ताव देतांना संपूर्ण विचार करून प्रस्ताव ठेवावा.

श्री.गजानन बारवाल :मोमीन सरदारखान हे सामाजिक व्यक्ती होते,त्यांचेकार्य अतिशय चांगले होते.

मा.महापौर :सभागृहात कूणीही वादविवाद करू नये,अंतर्गत बाब आहे.हा आपण एकत्रित बसून सोडवू शकतो.सभागृहात याबाबत अधिक बोलू नये. याबाबत नंतर विचार करू शकतो तूर्त हा विषय स्थगित करण्यात येतो, यावर पून्हा चर्चा करून योग्य तो विचार करून निर्णय घेवू शकतो. कृपया आपण शांत राहा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ६१२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक २६.१०.२००७ चा विषय क्रं.११८५/१० अन्वये महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम २००१ अंतर्गत सुंदरनगर नागेश्वरवाडी भोईवाडा दादा कॉलनी, कैलाशनगर,विजयनगर,गारखेडा,नारळीबाग आणि मंजनुहिल येथे अनाधिकृत वसाहती नियमाधिन करणेबाबत मंजुरी देण्यांत आली होती वरील वसाहती पैकी मंजनुहिल वसाहत वगळता इतर सर्व वसाहतीमध्ये १० टक्के खुली जागा सोडण्याची अट प्रशासना तर्फे टाकण्यांत आलेली नाही, मंजनुहिल भागाचा विकास देखील झालेला असुन महानगरपालिकेला पिकनिक सेन्टर/गार्डन साठी ४६३६ चौरस मिटर व १२ मिटर रस्त्यासाठी ३००० चौ.मि.जागा दिनांक १८/७/१९८५ रोजी ताबा पावतीनुसार दिलेली आहे उर्वरीत जागेचा विकास झालेला असुन सद्यपरिस्थीतीत या वसाहतीमध्ये कोठेही खुली जागा उपलब्ध नाही. त्यामुळे इतर वसाहतीप्रमाणेच या वसाहतीला देखील गुंठेवारी विकास अधिनियम २००१ अंतर्गत १० टक्के खुली जागा ठेवण्याची अट रद्द करून प्रशासनाने मूळ प्रस्तावात १० टक्के खुली जागा प्रस्तावित केली होती त्यात सुट देण्यांत यावी त्यामुळे वरील वसाहती प्रमाणे हि वसाहत देखील नियमित करता येईल. प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.मोहमंद जावेद मोहमंद इसाक		अनुमोदक :श्री.संजय जगताप

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक २६.१०.२००७ चा विषय क्रं.११८५/१० अन्वये महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम २००१ अंतर्गत

सुंदरनगर नागेश्वरवाडी भोईवाडा दादा कॉलनी, कैलाशनगर,विजयनगर,गारखेडा,नारळीबाग आणि मजनुहिल येथे अनाधिकृत वसाहती नियमाधिन करणेबाबत मंजुरी देण्यांत आली असल्यामूळे, तसेच वरील वसाहती पैकी मंजनुहिल वसाहत वगळता इतर सर्व वसाहतीमध्ये १० टक्के खुली जागा सोडण्याची अट प्रशासना तर्फे टाकण्यांत आलेली नसल्यामूळे, आणि मंजनुहिल भागाचा विकास झालेला असल्यामूळे, महानगरपालिकेला पिकनिक सेन्टर/गार्डन साठी ४६३६ चौरस मिटर व १२ मिटर रस्त्यासाठी ३००० चौ.मि. जागा दिनांक १८/७/१९८५ रोजी ताबा पावतीनुसार दिलेली आहे उर्वरीत जागेचा विकास झालेला असुन सद्यपरिस्थीतीत या वसाहतीमध्ये कोठेही खुली जागा उपलब्ध नसल्यामूळे,इतर वसाहतीप्रमाणेच या वसाहतीला देखील गुंठेवारी विकास अधिनियम २००१ अंतर्गत १० टक्के खुली जागा ठेवण्याची अट रद्द करणेस व प्रशासनाने मूळ प्रस्तावात १० टक्के खुली जागा प्रस्तावित केली होती त्यात सुट देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ६१३ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील मुख्य पशुसंवर्धन अधिकारी तथा संचालक, प्राणी संग्रहालय या पदावरील मनपाचे अधिकारी डॉ.रझवी हे नियत वयोमानानुसार निवृत्त झाल्यामूळे व बढतीने त्यांचे जागी नियूक्तीस पात्र पदवीधर पशुवैद्यकीय अधिकारी नसल्यामूळे,मनपामार्फत मागणी केल्यानुसार डॉ.बी.एस.नाईकवाडे यांची बदली प्रतिनियूक्तीने सन २००८-२००९ मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेत शासनामार्फत करण्यात आलेली आहे. त्यांना प्राणी संग्रहालय व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणासाठी मनपामार्फत बँगलोर व दिल्ली येथे पाठविण्यात आले होते. या प्रशिक्षणाचा उपयोग प्राणी संग्रहालयाचे व्यवस्थापन सुधारण्यासाठी झालेला आहे. तसेच त्यांनी त्यांचे एक वर्षाचे कार्यकाळात चांगले काम करून अनेक नाविण्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत. डॉ.बी.एस.नाईकवाडे यांच्या सेवेची महानगरपालिकेस आवश्यकता असल्यामूळे त्यांना मनपा सेवेत मुंबई मनपा प्रांतिक अधिनियमाच्या अटी व शर्तीस अधिन राहून कायमस्वरूपी वर्ग करणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर करण्यांत येतो.

सुचक : श्री.प्रशांत देसरडा अनुमोदक : श्री.गजानन रामकिशन बारवाल

मा.महापौर : विषय मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील मुख्य पशुसंवर्धन अधिकारी तथा संचालक, प्राणी संग्रहालय या पदावरील मनपाचे अधिकारी डॉ.रझवी हे नियत वयोमानानुसार निवृत्त झाल्यामूळे, महानगरपालिकेमार्फत मागणी केल्यानुसार डॉ.बी.एस.नाईकवाडे यांची बदली प्रतिनियूक्तीने सन २००८-२००९ मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेत शासनामार्फत करण्यात आलेली असल्यामूळे व त्यांनी त्यांचे एक वर्षाचे कार्यकाळात चांगले काम करून अनेक नाविण्यपूर्ण उपक्रम राबवले असल्यामूळे, डॉ.बी.एस.नाईकवाडे यांना महापालिका सेवेत कायमस्वरूपी वर्ग करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

याचवेळी सभागृहात स.सदस्याचे मोठमोठयाने बोलणे चालू असते, व्यासपीठाजवळ अनेक सदस्य जमा होतात.

**<u>चर्चा :</u>**

श्री.अ.रशिद खान : मंजूर करण्यास आमचा विरोध आहे.

श्री.संजय जगताप : यास मंजूर करण्यास विरोध आहे.

श्री.नासेर नाहदी

मा.महापौर : विषय क्र.६१३ मंजूर केलेला आहे. संपूर्णपणे प्रशासकीय कार्यवाही नियमाने हे प्रशासन बघेल यासह ऐनवेळचे सर्व विषयही मंजूर करण्यात येते.

याचवेळी डायस समोर स.सदस्यांचे मोठमोठयाने बोलणे चालू असते.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ६१४ :**

आयुक्त,प्रस्ताव सादर करीत आहे की, रेल्वे ओव्हर ब्रीज ते देवगिरी तरूण भारत पर्यंत रस्ता विकास कामात बाधीत होणाऱ्या जलवाहीन्या स्थलांतरीत करणे व नविन जलवाहीन्या टाकणे आहेत. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००६-०७ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.२६,१०,०००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. निविदा मंजूरीच्या कार्यवाही अंतर्गत मा.आयुक्त महोदय यांनी आदेशित केल्यानुसार सदर कामासाठी सुधारीत अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००८-०९ च्या दरसूची नुसार रक्कम रू.५२,६६,०६०/- एवढ्याचे तयार करण्यात आलेले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदीमधून करण्यात येईल.

करीता सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.५२,६६,०६०/- चे मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वे ओव्हर ब्रीज ते देवगिरी तरूण भारत पर्यंत रस्ता विकास कामात बाधीत होणाऱ्या जलवाहीन्या स्थलांतरीत करणे व नविन जलवाहीन्या टाकणेच्या रक्कम रू.५२,६६,०६०/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. तसेच सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या सेवाभरती नियमामध्ये पशुसंवर्धन विभागाकरीता सहाय्यक पशुधन विकास अधिकारी ह्या पदाचा समावेश आहे. परंतू सदरील पद हे आस्थापनेवर मंजूर नाही.

महानगरपालिका सेवाभरती नियमामध्ये सहाय्यक पशुधन विकास अधिकारी या पदाची वेतनश्रेणी रू.१४००-२६०० (जुनी) व सुधारीत ४५००-७००० अशी असून अर्हता व पात्रता खालीलप्रमाणे आहे.

| अर्हता | पात्रता |
|---|---|
| ०१. पशुवैद्यकशास्त्र आणि पशुसंवर्धन विषयातील पदवी.<br>०२. औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये आधिपासून सेवेत असल्याखेरीज करून ३० वर्षाहून अधिक वय नसावे. | ०१. सदर पदाची अर्हता असणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नियूक्ती.<br>०२. किंवा पशुधन पर्यवेक्षक म्हणून किमान १० वर्षाचा अनुभव असणाऱ्या पर्यवेक्षकामधून पदोन्नतीद्वारे नियूक्ती. |

शहरातील अनाधिकृत कत्तल रोखणे, उघड्यावर व विना परवाना मांस विक्री होवू न देणे, श्वान प्रतिबंधक योजना प्रभाविपणे राबविणेकरीता देखरेख करणे इत्यादी कामांसाठी दोन सहाय्यक पशुधन विकास अधिकारी पदाची आवश्यकता आहे.

त्यानुषंगाने महानगरपालिकेच्या सेवाभरती नियमामध्ये पशुसंवर्धन विभागाकरीता सहाय्यक पशुधन विकास अधिकारी ह्या पदाचा समावेश असून, सध्या सदरील पद हे आस्थापनेवर भरण्याबाबत मंजूरी देण्यांत यावी. जेणे करून सदरील पद भरण्याबाबत तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांत येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या सेवाभरती नियमामध्ये पशुसंवर्धन विभागाकरीता सहाय्यक पशुधन विकास अधिकारी ह्या पदाचा समावेश असून, सदरील पद हे आस्थापनेवर भरण्याबाबत मंजूरी देण्यांत येते सदरील पद भरण्यासाठी तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.आयुक्त यांची मंजूरी दि.२०.१२.२००८ व दि.२३.१२.२००८ च्या मा.स्थायी समितीने मंजूर केलेला ठराव क्र.१५९ मोहल्ला बुढ्ढीलेन येथील जामा मस्जीद परिसरात दफन विधीच्या पूर्वीचा विधी (नमाज-ए-जनाजा) केला जातो त्या ठिकाणी मार्बल बसविणेचे अंदाजपत्रक र.रू.१७.६० लक्षचे काम काझी मुबारीसउद्दीन, कंत्राटदार यांचे मार्फत चालू आहे. वर्ष २००९-१० च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.SCR-F ३ वरील लेखाशिर्ष स्मशानभूमी/ कब्रस्तान विकास कार्यक्रममध्ये अ.क्र.२ वर या उर्वरीत भागात मार्बल बसविण्यासाठी र.रू.२०.०० लक्षची तरतूद उपलब्ध आहे. उर्वरीत र.रू.२०.०० लक्षचे काम श्री.काझी मुबारीसउद्दीन यांचेकडून करून घेणेसाठी मुं.प्रां.मनपा अधि.१९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ (२)(२) अन्वये स्थायी समिती ठराव क्र.९८ दिनांक १८.०८.२००९ नुसार मंजूरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार मूळ कामाची रक्कम रू.१७.६०+उर्वरीत कामाची र.रू.२०.००लक्ष असे एकूण र.रु.३७.६०लक्षचे मार्बल बसविणेचे सुधारीत अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव व स्थायी समितीच्या मंजूरीनुसार श्री.काझी मुबारीसउद्दीन स्थापत्य अभियंता/कंत्राटदार कडून अं.प.दराने करून घेणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.निसार खान, श्री.जावेद हसन खान

अनुमोदक : श्री.रविकांत गवळी,श्री.सय्यद खुसरो,श्री.अ.साजेद अ.सत्तार,सौ.सोफिया मोमीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला बुढ्ढीलेन येथील जामा मस्जीद परिसरात दफन विधीच्या पूर्वीचा विधी (नमाज-ए-जनाजा) केला जातो त्या ठिकाणी मार्बल बसविणेचे सद्यस्थितीत सुरू असलेले कामात उर्वरीत भागात मार्बल बसविण्यासाठी र.रू.२०.०० लक्षचे काम श्री.काझी मुबारीसउद्दीन यांचेकडून करून घेणेसाठी मुं.प्रां.मनपा अधि.१९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ (२)(२) अन्वये स्थायी समिती ठराव क्र.९८ दिनांक १८.०८.२००९ नुसार मंजूरी प्राप्त झाल्यानुसार मूळ कामाची रक्कम रू.१७.६०+उर्वरीत कामाची र.रू.२०.०० लक्ष असे एकूण र.रु.३७.६० लक्षचे मार्बल बसविणेचे सुधारीत अंदाजपत्रकास तसेच स्थायी समितीच्या मंजूरीनुसार श्री.काझी मुबारीसउद्दीन स्थापत्य अभियंता/कंत्राटदार कडून अं.प.दराने करून घेणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१७ :**

वॉर्ड क्र.४८ एन-६ साईनगर सिडको येथे योगा शेड बांधणेचे रक्कम रूपये २.०० लक्षचे काम प्रगतीपथावर असून सदरील योगा शेडचे आकार लहान होत असल्याने ते वाढवण्याची मागणी प्रभागातील नागरीकांनी केलेली आहे.

त्याकरीता जास्तीची रक्कम रूपये ३.५० लक्षाची तरतूद लागणार असल्याने अर्थसंकल्प सन २००९-१० अंतर्गत पा.क्र.SCRG-१ वर नविन उद्याने अंतर्गत रक्कम रूपये १०.०० लक्षाची तरतूद उपलब्ध असून सदरील तरतूद उपरोक्त कामासाठी वळती करण्याचा तसेच सदर वाढीव काम कामाचे मूळ गुत्तेदार यांच्याकडून करून घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर

अनुमोदक : श्री.दामोधर शिंदे,श्री.विनायक पांडे,श्री.भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४८ एन-६ साईनगर सिडको येथे योगा शेड बांधणेचे वाढीव कामासाठी लागणारी जास्तीची रक्कम रूपये ३.५० लक्षाची तरतूद अर्थसंकल्प सन २००९-१० अंतर्गत पा.क्र.SCRG-१ वर नविन उद्याने अंतर्गत असलेली रक्कम रूपये १०.०० लक्षाच्या तरतूदीमधून उपरोक्त कामासाठी वळती करण्यास व वाढीव काम, कामाचे मूळ गुत्तेदार यांच्याकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, E.E.E.९४ शहरी भागात खुल्या गटारी बांधणे अ.क्र.२ वार्ड क्र.५० विद्यानिकेतन कॉलनी येथील पावसाचे पाणी निचरा होण्यासाठी गटार बांधणे ६.०५ लक्ष तरतूद स्पील ओव्हरमध्ये आहे. जागेची अडचण असल्यामूळे, सदरील काम रद्द करून त्याऐवजी बायजीपुरा येथे रस्ता कॉक्रेटींग करणे व साईड ड्रेनेज करणे. अशाप्रकारे शिर्षक बदलणेचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.प्रशांत देसरडा अनुमोदक : श्री.संजु रिडलॉन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, E.E.E.९४ शहरी भागात खुल्या गटारी बांधणे अ.क्र.२ वार्ड क्र.५० विद्यानिकेतन कॉलनी येथील पावसाचे पाणी निचरा होण्यासाठी गटार बांधणे र.रू.६.०५ लक्ष तरतूद स्पील ओव्हर याऐवजी बायजीपुरा येथे रस्ता कॉक्रेटींग करणे व साईड ड्रेनेज करणेसाठी लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक व आपत्कालीन सेवा असल्यामूळे, अग्निशमन विभागात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना, २४ तास सेवा देता यावी म्हणून कार्यालयाच्या आवारातच निवासस्थाने पुरविल्या जातात. सदरील निवासस्थाने ही आपत्कालीन वेळेस रात्री अपरात्री संकट समयी कर्मचारी उपलब्ध व्हावेत यासाठी महाराष्ट्र सरकार यांचा आदेश Urban Development, Public Health & Housing Department Resolution No : FFS -3071/81122-N, Sachivalaya, Bombay-32, dated 30th September 1972 नुसार निवासस्थाने २४ तास सेवा देणाऱ्या अधिकाऱ्यांना रेंट फ्री व लाईट फ्री या संज्ञे अंतर्गत उपलब्ध करून दिलेली आहेत. सदरील कर्मचाऱ्यांना मासिक पगारात घरभाडे भत्ता देण्यात येत नाही. महाराष्ट्रातील खालीलप्रमाणे महानगरपालिका अग्निशमन सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना रेंट व विद्युत फ्री निवासस्थानाची सवलत देण्यात येते.(सोबत आदेश जोडण्यात आले आहेत) इतर महानगरपालिकेच्या तुलनेत औरंगाबाद महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात सध्या अधिकारी/कर्मचारी सर्वात कमी आहेत.

०१. ठाणे महानगरपालिका पत्र क्र.ठामपा/मुअअ/मु ३२६/१३५०, दिनांक २९.०६.२००९
०२. मुंबई महानगरपालिका परीपत्रक क्र.१०१, दिनांक २४.०३.२००८
०३. नाशिक महानगरपालिका पत्र क्र.मनपा/अशा/वशि/४१९/९६-९७, दिनांक ०६.०८.१९९६
०४. कोल्हापुर महानगरपालिका पत्र क्र.अग्नि/वशि-२२, दिनांक ०८.०७.१९९७

औरंगाबाद अग्निशमन विभागातील २४ तास काम करणाऱ्या अग्निशमन अधिकारी/कर्मचारी वर्गास मोफत लाईट/वीज पूर्वलक्षी प्रभावाने मान्यता देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव/विचारार्थ सादर.

सुचक : श्री.गजानन रामकिशन बारवाल,श्री.विनायक पांडे,श्री.शशांक विसपुते
अनुमोदक : श्री.सतिष कटकटे,श्री.भाऊसाहेब ताठे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद अग्निशमन विभागातील २४ तास काम करणाऱ्या अग्निशमन अधिकारी/कर्मचारी वर्गास मोफत लाईट/वीज पूर्वलक्षी प्रभावाने देण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, एन-१ सिडको भागातील उद्यानास जिजामाता उद्यान असे नामकरण करण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : सौ.दिपाली सुनिल पाटील, डॉ.श्री.भागवत कराड
अनुमोदक : श्री.महेश माळवतकर, श्री.प्रशांत देसरडा

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-१ सिडको भागातील उद्यानास जिजामाता उद्यान असे नांव देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ६२१ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, एन-१ टाऊन सेंटर येथील उद्यानास महर्षी दयानंद सरस्वती असे नांव देण्यांत यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.प्रशांत देसरडा, डॉ.श्री.भागवत कराड

अनुमोदक : सौ.दिपाली पाटील,श्री.महेश माळवतकर

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-१ टाऊन सेंटर येथील उद्यानास महर्षी दयानंद सरस्वती असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ६२२ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, एन-७,एन-८ भागातील नागरीकांची व कार्यकर्त्यांची सदर चौकास क्रांतीवीर लहुजी साळवे चौक असे नामकरण करावे अशी मागणी असल्याने व गेल्या ८ वर्षापासून सदर चौकास तसे संबोधण्यात येते. तसेच क्रांतीवीर लहुजी साळवे जयंती निमित्त सतत तेथे कार्यक्रम होत असतात. तरी सदर क्रांतीवीर लहुजी साळवे ह्यांचे नांव सदर चौकास देण्याची शिफारस आहे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.जेम्स अंबिलढगे, श्री.काशिनाथ कोकाटे अनुमोदक : श्री.अशोक विरकर

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-७,एन-८ भागातील चौकास क्रांतीवीर लहुजी साळवे चौक असे नांव देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.